वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शुक्रवार दि.१९ डिसेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# मुख्यमंत्र्यांच्या पापी हाताने सरकारी मंचावर महिला डॉक्टरचा विनयभंग?

# मुस्लिम धार्मिक संघटना गप्प का?

## या संघटना फक्त देणगी (चंदा)गोळा करण्यासाठी आहेत का?




हा प्रश्न केवळ हिजाबचा नाही. हा प्रश्न महिलेच्या संमतीचा आहे. हा प्रश्न तिच्या आत्मसन्मानाचा आहे. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे हा प्रश्न संविधानाच्या अस्तित्वाचा आहे. कलम २१ – सन्मानाने जगण्याचा अधिकार. कलम २५ – धार्मिक आचरणाचं स्वातंत्र्य. मग मुख्यमंत्री कोणत्या अधिकाराखाली हा हिजाब काढतात? हा आदेश कुठल्या कायद्यात लिहिला आहे? की सत्तेचा माज म्हणजेच कायदा?

Email:- dailydivyawarta@Gmail.com
दिव्य वार्ता
Email:-editordivyawarta@gmail.com






**लोकशाहीत सत्तेला मर्यादा असतात. पण बिहारच्या एका सरकारी मंचावर त्या मर्यादा केवळ ओलांडल्या गेल्या नाहीत, तर पायाखाली तुडवल्या गेल्या. आयुष विभागातील नियुक्तीपत्र स्वीकारण्यासाठी मंचावर उभ्या असलेल्या एका मुस्लिम महिला डॉक्टरचा मुख्यमंत्री स्वतः हात घालून हिजाब हटवतो, आणि हा सारा प्रकार कॅमेऱ्यांसमोर, सार्वजनिकरित्या घडतो.**

**दैनिक दिव्य वार्ता — अन्यायावर-प्रहार दृष्टांचा संहार**


### विशेष संपादकीय

हा प्रकार जर विनयभंग नाही तर मग विनयभंग म्हणजे नक्की काय असतं? परवानगीशिवाय एखाद्या महिलाच्या शरीराशी किंवा पोशाखाशी स्पर्श करणे हा गुन्हाच आहे. मग तो स्पर्श एखाद्या सामान्य व्यक्तीचा असो किंवा मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीवर बसलेल्या व्यक्तीचा – कायदा दोघांनाही सारखाच लागू होतो, की सत्तेसाठी वेगळा संविधान आहे?

या घटनेनंतर मुख्यमंत्री ना खेद व्यक्त करतात, ना माफी मागतात. उलट निर्लज्ज शांतता पाळतात. ही शांतता निष्पाप नाही; ही शांतता माझं कुणी काही वाकडं करू शकत नाही या अहंकारातून आलेली आहे.आणि इथेच आणखी एक भयावह वास्तव समोर येतं. मुस्लिम धार्मिक आणि सामाजिक संघटनांची भ्याड गप्पी. ज्या संघटना छोट्या मुद्द्यांवर प्रेस नोटा काढतात, ज्या देणग्यांसाठी भावनिक भाषणं देतात,ज्या राजकीय व्यासपीठांवर धर्माचा झेंडा उंचावतात – त्या सगळ्या आज एका मुस्लिम महिला डॉक्टरच्या अपमानावर गप्प आहेत का? कारण आरोपी मुख्यमंत्री आहे? कारण सत्ता ताकदवान आहे? की महिला असल्यामुळे तिचा अपमान दुय्यम मानला जातो?जर हेच कृत्य एखाद्या पोलीस अधिकाऱ्याने, प्राध्यापकाने किंवा सामान्य माणसाने केलं असतं, तर घोषणा, मोर्चे, धमक्या आणि निषेधांचा पाऊस पडला असता. पण मुख्यमंत्री हात लावतो, आणि सगळे डोळे झाकून बसतात. आज हिजाब उतरवला गेला. उद्या कपडे उतरवतील आणि परवा एखाद्या समुदायाचं अस्तित्व. ही साखळी आज तोडली नाही, तर उद्या उशीर झालेला असेल. हा लेख केवळ टीका करण्यासाठी नाही. हा लेख इशारा आहे.जर मुख्यमंत्री विनयभंगाच्या आरोपावरही माफी मागत नसतील, जर धार्मिक संघटना महिलांच्या सन्मानासाठी उभ्या राहत नसतील, जर समाज अन्याय पाहूनही गप्प असेल. तर मग लोकशाही ही केवळ नावापुरती उरते. आज प्रश्न विचारणं गरजेचं आहे, कारण गप्प बसणं हीसुद्धा गुन्ह्यातील भागीदारीच असते.

## कर्तव्यावर असतांनाच काळाचा घाला

### भरधाव वाहनाच्या धडकेत तरूण पोलीस अंमलदाराचा मृत्यू



आष्टी, (दिव्य न्युज):- रात्रीची वेळ... सगळी दुनिया गाढ झोपलेली असताना, आपल्या सुरक्षेसाठी डोळ्यात तेल घालून राशीन चौकी अंतर्गत येणाऱ्या रस्त्यावर गस्तीवर असताना पान २ वर

## स्व.संतोष देशमुख सारखं तुळजापुरात करायचं होतं का?

### ठाकरेंच्या खासदाराच्या दाव्यामुळे तुळजापुरात खळबळ



उस्मानाबाद, (दिव्य न्युज):- जिल्ह्यातील तुळजापूर येथे घडलेल्या हिंसाचाराच्या घटनेनंतर खासदार ओमराजे निंबाळकर चांगलेच संतप्त झाले आहेत. कुलदीप मगर यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याबाबत त्यांनी गंभीर सवाल उपस्थित करत, संतोष देशमुखांसारखीच घटना तुळजापूरात घडवायची होती का? असा थेट प्रश्न विचारला आहे. ▶▶ पान २ वर

## जि.प.च्या हातपंप विभागातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्याला पेन्शन मिळेना

## पेन्शन नसल्याने उपचाराअभावी पेन्शनरचा मृत्यू



बीड, (दिव्य न्युज):- जिल्हा परिषदेच्या हातपंप विभागातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना वेळेवर पेन्शन मिळत नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची आणि कर्जबाजारी होण्याचीवेळ आली आहे. एका पेन्शनरला उपचार करण्यासाठी वेळेवर पैसे नसल्याने त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी जि.प.च्या सीईओ यांनी याची दखल घेवून पेन्शनर कर्मचाऱ्यांना वेळेवर पेन्शन देण्याची मागणी केली जात आहे.

जिल्हा परिषदेच्या हातपंप विभागातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना वेळेवर पेन्शन दिली जात नाही. नागोराव साहेबराव गालफाडे (वय ७५) हे डायलेसिसवर ▶▶ पान २ वर

## कोर्टाने नाव पुकारलं अन् सुदर्शन घुले चक्कर येऊन पडला

### सर्व आरोपींकडून वेळकाढूपणा?



मुंबई , (दिव्य न्युज):- संतोष देशमुख खून प्रकरणात आरोपींवर चार्ज फ्रेम होण्याची वेळ आलेली आहे. शुक्रवारी (दि. १९) कोर्टात सुनावणी सुरु असताना सुदर्शन घुले या आरोपीला चक्कर आली. त्यामुळे कोर्टाचा वेळ गेला. मागच्या सुनावणीवेळी आरोपी प्रतीक घुले याला अशीच चक्कर आलेली होती. चार्ज फ्रेम करु ▶▶ पान २ वर

## उधारीवर कपडे न दिल्याने तरुणावर कोयत्याने वार

### अंबाजोगाईतील पाटील चौकातील थरार

अंबाजोगाई , (दिव्य न्युज):- शहराच्या मध्यवर्ती असलेल्या पाटील चौक भागात उधारीवर कपडे देण्यास नकार दिल्याच्या क्षुल्लक कारणावरून कपड्याच्या दुकानदारावर कोयत्याने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी दुपारी घडली आहे. प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार संकेत विनोद नरके (वय २१, रा. खडकपुरा, अंबाजोगाई) ▶▶ पान २ वर

# आरक्षण मर्यादेतच, पण निवडणुकांचा संभ्रम अद्याप कायम

## झेडपी, पंचायत समिती इच्छूकांची घालमेल

**बीड, (दिव्य न्युज):- बीड,. मागील पावणेचार वर्षे विविध कारणांनी लांबलेली जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठीची सर्व तांत्रिक प्रक्रिया पार पडल्याने आता निवडणूक होणार असून इच्छुकांकडून जोरात तयारी सुरू असतानाच, निवडणुकीबाबत पुन्हा एकदा संभ्रम निर्माण झाला आहे.**

विशेष म्हणजे, जिल्हा निवडणूक विभागाने पाठविलेल्या अहवालानुसार आरक्षण मयदित (५० टक्क्यांच्या आत) असतानाही, निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात बीड जिल्हा परिषदेच्या समावेशाची शक्यता धूसर असल्याने इच्छुकांची घालमेल सुरू झाली आहे.

फेब्रुवारी २०१७ मध्ये जिल्हा परिषद व जिल्ह्यातील ११ पंचायत समित्यांच्या निवडणुका झाल्या होत्या. मार्च २०२२ मध्ये कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ संपल्यानंतर प्रशासक कामकाज पाहत आहेत. सुरवातीला कोविड संसर्गामुळे निवडणूक लांबली, नंतर ओबीसी आरक्षण आणि प्रभाग रचनेचा मुद्दा न्यायालयात गेल्यामुळे निवडणूक पुढे ढकलली गेली. मे महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक घेण्याबाबत शासन व आयोगाला आदेश दिल्यानंतर पुन्हा प्रभाग रचना व आरक्षण प्रक्रियाही पूर्ण करण्यात आल्या. सर्व प्रक्रियेचा आढावा घेतल्यानंतर निवडणुकीचा जाहीर कार्यक्रम येणार आहे, पण आरक्षण मयदिचा मुद्दा पुन्हा समोर आल्याने बीड

### इथे होणार निवडणुका

राज्यातील अहिल्यानगर, रायगड, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, जालना, पुणे, सोलापूर, परभणी, कोल्हापूर, बीड, सातारा, सांगली, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या १४ जिल्हा परिषदांमध्ये आरक्षण ५० टक्क्यांच्या आत असतानाही, आयोगाने केवळ १२ जिल्हा परिषदांमध्ये निवडणूक होणार असल्याचे सांगितल्याने बीड जिल्हा परिषद आणि ११ पंचायत समित्यांच्या निवडणुकीबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. बीड जिल्हा परिषदेत सामाजिक आरक्षणाची टक्केवारी ४२ असून, जिल्ह्यातील ११ पंचायत समित्यांमधील आरक्षणदेखील ५० टक्क्यांच्या आत आहे.




जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीबाबत संभ्रम कायम आहे. आयोगाने जिल्हा परिषद निवडणुकांच्या संदर्भात सामाजिक आरक्षण ५० टक्क्यांच्या आत असलेल्या १२ जिल्हा परिषदांमध्ये लवकरच निवडणूक जाहीर करणे सुचवले आहे.

## ‘एचआर नंबर प्लेट’चा नियम फक्त सामान्य नागरिकांसाठीच का?

# प्रशासकीय वाहनांवर ‘एचआर’चा अभाव!

**बीड, (दिव्य न्युज):– महाराष्ट्र शासनाने वाहनांसाठी हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट (ज्याला अनेक ठिकाणी ’एचआर नंबर प्लेट’ म्हणून ओळखले जाते) बंधनकारक केली आहे. सुरक्षेच्या दृष्टीने आणि वाहनांची ओळख तत्काळ पटवण्यासाठी हा नियम अत्यंत महत्त्वाचा असताना, याचे पालन फक्त सामान्य आणि गरीब नागरिकच करताना दिसत आहेत. दुर्दैवाची बाब म्हणजे, प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अनेक शासकीय व खासगी वाहनांवर अद्यापही ’एचएसआरपी’ नंबर प्लेट बसवलेली नाही.**







नियम फक्त सर्वसामान्यांसाठीच? परिवहन विभागाने एचएसआरपी नंबर प्लेट न लावलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे सामान्य नागरिकांना मोठा दंड भरावा लागत आहे आणि ते नियमांचे पालन करत आहेत. सामान्य नागरिक: नियमाचे पालन करत नंबर प्लेट बसवत आहेत किंवा दंड भरत आहेत.प्रशासकीय वाहने: उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पोलीस अधिकारी, आणि नगर परिषद/ महापालिका कर्मचाऱ्यांच्या अनेक गाड्यांना अद्यापही जुन्या पद्धतीच्या नंबर प्लेट आहेत. काही गाड्यांवर तर नंबर प्लेटच नाहीत किंवा तुटलेल्या आहेत.

प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई कधी? एकीकडे, परिवहन विभाग सामान्य नागरिकांवर कडक कारवाई करत आहे, तर दुसरीकडे खुद्द शासकीय कार्यालयांच्या आवारात उभ्या असलेल्या वाहनांना हा नियम लागू नसल्यासारखे चित्र आहे. नियमानुसार, वाहन कोणाचेही असो, एचएसआरपी नंबर प्लेट असणे बंधनकारक आहे.या दुटप्पी भूमिकेमुळे सामान्य नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांनी थेट प्रश्न विचारला आहे की, जर हा नियम सुरक्षेसाठी महत्त्वाचा आहे, तर तो फक्त गरीब आणि सामान्य जनतेलाच का लागू आहे? प्रशासकीय अधिकारी, जे स्वतः नियम बनवतात, ते त्याचे उल्लंघन का करत आहेत? प्रशासकीय वाहनांवर नियमांचे उल्लंघन होत असताना त्यांच्यावर कारवाई कधी होणार?या विषयावर वरिष्ठ प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन सर्व शासकीय आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट लावणे बंधनकारक करावे आणि त्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर सामान्य नागरिकांप्रमाणेच दंड आकारला जावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# एकाच रेशन कार्ड वरती कोकाटे बंधूंनी दोन घर लाटली, राजकीय ताकदीचा वापर केला

## कोर्टात वकिलांनी माणिकरावांचा कच्चाचिट्ठाच काढला

मुंबई , (दिव्य न्युज):– नाशिकच्या शासकीय सदनिका घोटाळा प्रकरणात दोषी ठरल्यानंतर मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या अडचणी अद्याप संपलेल्या नाहीत. सत्र न्यायालयाच्या निकालाला आव्हान देत कोकाटेंनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली असून त्यांच्या याचिकेवर न्यायमूर्ती आर. एन. लड्ढा यांच्या एकलपीठासमोर सुनावणी पार पडली आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे दुर्बल घटकांसाठी राखीव असलेल्या शासकीय सदनिकांचा लाभ घेतल्याचा ठपका कोकाटेंवर ठेवण्यात आला आहे. या प्रकरणात दोषी ठरल्यानंतर त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला, तरी आता अटकेची भीती आणि आमदारकी जाण्याची टांगती तलवार त्यांच्या डोक्यावर आहे. या पार्श्वभूमीवर कोकाटेंनी सत्र न्यायालयाने सुनावलेली शिक्षा स्थगित ठेवण्याची मागणी उच्च न्यायालयात केली आहे. या प्रकरणी युक्तीवाद करत असताना हस्तक्षेप याचिकाकर्त्यांचे वकील ॲड. मनोज मोहिते यांनी



माणिकराव कोकाटेंच्या विरोधात जोरदार युक्तीवाद केला.

हस्तक्षेप याचिकाकर्त्यांचे वकील ॲड. मनोज मोहिते यांनी म्हटलं की, अल्प उत्पन्न गटातील गरजूंच्या घरांच्या लाटण्याचा प्रकार झाला आहे आणि त्यांनी एकट्यानी हे केलं नाही तर यांचा भाऊ देखील आहे. तेव्हा ते सभापती होते आणि वकील देखील होते. त्यांना कायदा माहीत नाही असं नाही. ते राजकारणात होते. हस्तक्षेप याचिकेची प्रत आम्हाला मिळाली नसल्याची कोकाटेंच्या वकिलांची माहिती कोर्टात दिली.

तर माणिकराव कोकाटे आणि त्यांच्या भावाने एकच रेशन कार्ड असतानाही वेगवेगळ्या पद्धतीने २ घरे लाटली आहेत. २५ एकर जमिनीचा उल्लेख पिस्तुल परवानगीसाठी देण्यात आलेल्या कागदपत्रात केलेला आहे. तेव्हा ते सभापती होते, त्यांच्या राजकारणात ताकदीचा वापर त्यांनी केला आहे, त्यांना नियम माहीत होते. दोन्ही एकाच कुटुंबातील सदस्य असताना २ घरे घेतली. त्यांच्या वडिलांकडे २५ एकरांची जमीन होती, असा युक्तीवाद हस्तक्षेप याचिकाकर्त्यांच्या वकीलांनी केला आहे. तर या संदर्भात कोर्टाने त्यासंदर्भातील पुराव्यांची मागणी केली आहे.वडिलांची २५ एकरांची जमीन आहे, तुम्ही नाकारलं का नाही, शेत जमीन होती की नाही कोर्टाची कोकाटेंच्या वकिलांना विचारणा केली आहे. मात्र शेतजमिनीतून येणाऱ्या उत्पन्नाचा तुम्ही उल्लेख केलेला नाही. त्यावेळच्या अथॉरिटीचा देखील निष्काळजीपणा होता तुमच्या अर्जात आणि प्रतिज्ञापत्रात समानता आढळून येत नाही याबाबतची विचारणा देखील कोर्टाने कोकाटेंना केली आहे. तर मुख्य सरकारी वकील मनकूवर देशमुख राज्य सरकारची बाजू मांडत आहेत, वीकर सेक्शनसाठी असलेल्या घरांचा गैरव्यवहार करणे दुर्दैवी असल्याचं सरकारी पक्ष म्हटलं आहे. राज्य सरकारने वेळ मागितला, मात्र वेळ देण्यास कोर्टाने नकार दिला आहे. कोकाटेंच्या याचिकेला सरकारने देखील विरोध केला आहे. शिक्षेला स्थगिती देण्यास राज्य सरकारने विरोध दर्शवला आहे. तर मनकुवर देशमुख यांनी माहिती देताना सांगितलं की, २५ एकर जमिनीचा जो काही दावा केला जातोय तो कागदोपत्री उपलब्ध नाही. मंत्रीपदाच्या राजीनाम्या संदर्भात कोर्टाकडून यावेळी विचारणा करण्यात आली आहे. कोकाटे किती वर्षापासून आमदार आहेत अशी विचारणा देखील कोर्टाने केली आहे. कोर्टाकडून या प्रकरणाव्यतिरिक्त उर्वरीत सगळी प्रकरण रद्द केली आहेत.



गैरव्यवहारामुळे गच्छंती झालेल्या मंत्र्यांच्या संख्येत वाढ

## बॅ. अंतुले ते माणिकराव कोकाटे

**मुंबई :** गैरव्यवहार किंवा भ्रष्टाचारांच्या आरोपांमुळे राज्यात विविध सरकारमधील अनेक मंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी केलेल्या आरोपांच्या चौकशीसाठी नेमलेल्या न्या. पी. बी. सावंत आयोगाच्या अहवालानंतर सुरेश जैन, डॉ. पद्मसिंह पाटील, नवाब मलिक यांना राजीनामा द्यावा लागला होता. मुख्यमंत्रीपदावर असताना गैरव्यवहारांच्या आरोपांवरून आतापर्यंत बॅ. ए. आर. अंतुले, शिवाजीराव निलंगेकर-पाटील व अशोक चव्हाण या तिघांना राजीनामा द्यावा लागला आहे. विलासराव देशमुख व आर. आ. पाटील या मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना मुंबईवरील २६ /११च्या दहशतवादी हल्ल्यानंतर राजीनामा द्यावा लागला होता.

शासकीय सदनिकेसाठी बनावट कादगपत्रे सादर केल्याचे सिद्ध झाल्याने न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा ठोठावल्यानंतर माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा घेण्यात आला. गेल्या वर्षी कोकाटे यांना अभय देण्यात आले होते. भ्रष्ट मंत्र्यांना पाठीशी घालत असल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवारांवर टीका झाल्याने कोकाटे यांना अखेर घरचा रस्ता दाखविण्यात आला.

**राजीनामे द्यावे लागलेले मुख्यमंत्री**

Click and view article

- ... अंतुले (सिमेंट घोटाळा)
- ...लंगेकर - पाटील (मुलीचे गुण वाढविण्याचे प्रकरण),
- अशोक चव्हाण (आदर्श घोटाळा)

**उपमुख्यमंत्री**

- बॅ. रामराव आदिक ( गैरवर्तन)
- छगन भुजबळ (तेलगी घोटाळा आणि वृत्तवाहिनीच्या कार्यालयावरील हल्ला)

**मंत्री**

- सुरेश जैन (जळगाव जिल्हा मध्यवर्ती बँक व घरकुल घोटाळा)
- डॉ. पद्मसिंह पाटील (साखर कारखाना, जिल्हा बँक घोटाळा)
- नवाब मलिक ( भ्रष्ट कारभार)
- सुरुपसिंह नाईक (जंगलात बेकायदा वखारींना परवानगी)
- अनिल देशमुख (१०० कोटींच्या खंडणीचा आरोप)
- शशिकांत सुतार (भ्रष्टाचाराचा आरोप)
- बबन घोलप (भ्रष्टाचारावरून ताशेरे)
- गुलाबराव देवकर (जळगाव घरकूल घोटाळा)
- संजय राठोड (युवतीची आत्महत्या)

**तीन माजी गृहमंत्री तुरुंगात**

गृहमंत्रीपद भूषविलेले छगन भुजबळ, डॉ. पद्मसिंह पाटील आणि अनिल देशमुख या तिघांना गैरव्यवहार किंवा खुनाच्या आरोपात अटक झाली. तिघेही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होते. यापैकी डॉ. पाटील यांनी विधानसभा निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादीला रामराम ठोकला होता.

पान १ वरून

## पेन्शन नसल्याने

होते. त्यांच्या उपचारासाठी त्यांना पैसे नव्हते. जि.प.ने त्यांची पेन्शन वेळेवर खात्यावर जमा केली नसल्याने उपचाराअभावी त्यांचा मृत्यू झाला. दरम्यान पाणी पुरवठा विभागातील शेलार नामक कर्मचारी पेन्शनरची पिळवणूक करत आहे. त्यांच्या या अरेरावी पणामुळे पेन्शनर त्रस्त झाले आहेत. वित्त विभागाने तीन महिन्याच्या पेन्शनसाठी ७० लाख रूपयांचा निधी अदा केला आहे तरीही पेन्शनरला पैसे मिळाले नाहीत. पेन्शनरचे हाल थांबविण्यात यावे आणि त्यांनावेळेवर पेन्शन द्यावी अशी मागणी जि.प.च्या सीईओकडे गालफाडे शहाबाई नागोराव, प्रकाश नागोराव गालफाडे, श्रीकांत गालफाडे आणि मनिषा गालफाडे यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.

## स्व.संतोष देशमुख

बीड जिल्ह्यात मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची ज्या अमानुष पद्धतीने हत्या झाली, त्याच प्रकारची भीती आणि दहशत तुळजापूरात निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे का, असा आरोप त्यांनी केला.कुलदीप मगर यांच्या जबाबाचा उल्लेख करत ओमराजे निंबाळकर म्हणाले की, तू पीटू गंगणे यांच्या विरोधात काम केलं आहे. तर तुला उचलून नेऊन त्यांच्या समोरच तुला मारू, अशा पद्धतीची धमकी जर या गुंड वृत्तीची लोक एखाद्याच्या घरात जाऊन देत असतील तर नेमकं काय त्यांना दर्शवायचं आहे.

घरात घुसून धमक्या देणे, उचलून नेऊन मारहाण करण्याची भाषा करणे, हे सरळसरळ गुंडगिरीचे लक्षण आहे. एखाद्या व्यक्तीने राजकीय विरोधात काम केले म्हणून त्याच्यावर तलवार, कोयता आणि बंदुकीचा वापर होतो, ही बाब अत्यंत गंभीर आहे. बीडप्रमाणेच तुळजापुरातही दहशत रुजवायची आहे का?, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.तुळजापुरातील नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा प्रकार घडला. महाविकास आघाडीचे उमेदवार अमर मगर यांचे बंधू ऋषी मगर आणि भाजपचे उमेदवार पिटू गंगणे यांच्यात सुरुवातीला वाद झाला होता. तो वाद मिटल्याचे सांगितले जात असतानाच काही वेळाने अमर मगर यांचे दुसरे बंधू कुलदीप मगर यांच्यावर हल्ला करण्यात आला.

कुलदीप मगर यांच्या म्हणण्यानुसार, पिटू गंगणे यांच्या विरोधात प्रचार केल्यामुळेच आपल्यावर हल्ला झाला. या हल्ल्यात धारदार शस्त्रांचा वापर झाला असून जीवे मारण्याच्या उद्देशाने गोळीबारही झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.या घटनेनंतर खासदार ओमराजे निंबाळकर यांनी पोलिसांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना अप्रत्यक्षपणे संरक्षण दिले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. ड्रग्स प्रकरणात अडकलेल्या लोकांकडे गावठी कट्टे आणि पिस्तुलं कुठून येतात, याची सखोल चौकशी व्हावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

## कर्तव्यावर असतांनाच

भरधाव अज्ञात वाहनाने जोराची धडक दिल्याने सुदाम राजकुमार पोकळे वय वर्ष २९ याचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी पहाटे सव्वा दोनच्या दरम्यान घडली. आष्टी तालुक्यातील चिंचाळा येथील रहवासी असलेले सुदाम पोकळे हे अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत पोलीस ठाण्या अंतर्गत येणाऱ्या राशीन पोलीस चौकीत कार्यरत होते.गुरूवारी रात्री गस्तीवर असताना शुक्रवार पहाटे सव्वा दोनच्या दरम्यान भरधाव आलेल्या अज्ञात वाहनाने पोकळे यांना जोराची धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली.त्याच्या पश्चात आई, वडिल, भाऊ,पत्नी,मुलगा,असा परिवार आहे.

## कोर्टाने नाव

नये, वेळ द्यावा अशी मागणी सातत्याने आरोपींचे वकील करीत आहेत. यापूर्वी अनेकदा असाच वेळकाढूपणा आरोपींकडून झालेला आहे. खुद्द उज्वल निकम यांनीही ही बाब वारंवार कोर्टाच्या निदर्शनास आणून दिलेली होती.

शुक्रवारी संतोष देशमुख हत्या प्रकरणाची सुनावणी सुरु असताना न्यायालयाकडून आरोपींना पुकारण्यात आले. त्यावेळी ज्ञानेश्वर उर्फ सुदर्शन घुले याला अचानक चक्कर आल्याने तो काही काळ सुनावण्यासाठी गैरहजर राहिला. नाव पुकारल्यानंतर घुले हा चक्कर येऊन खाली पडला, असं सांगितलं जातंय. काही काळानंतर पुन्हा आरोपींना कोर्टाने पुकारल्यानंतर सुदर्शन घुले हा व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात हजर झाला.ज्यावेळी न्यायालयाकडून आरोपींची ओळख परेड घेण्यात आली, नाव पुकारण्यात आले त्यावेळी हा प्रकार घडला. यावेळी मयत सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख उपस्थित होते. आरोपींवर आजच (शुक्रवारी) चार्ज प्रेम होण्याची शक्यता आहे. या प्रकरणातला मुख्य आरोपी वाल्मिक कराड आणि इतर आरोपी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सुनावणीसाठी न्यायालयात हजर होते.

शुक्रवारी सकाळी ११ वाजता बीडच्या न्यायालयात सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या सुनावणीला सुरुवात झाली. सरकारी पक्षाचे सहाय्यक सरकारी वकील ॲड. बाळासाहेब कोल्हे यांनी सुरुवातीला युक्तिवाद केला. त्यानंतर आरोपी कराड आणि चाटे वगळता इतर आरोपींनी सरकारी वकील उज्वल निकम हे राजकीय पक्षाशी संबंधित असल्याने त्यांना यातून बाजूला करावे, असा अर्ज न्यायालयाकडे दिला.

विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांना बदलण्यात यावं. ते एका राजकीय पक्षाशी संबंधित असल्याने केसवर परिणाम होत आहे, असा अर्ज आरोपींनी कोर्टाकडे केला.अशी कायद्यात कुठेही तरतूद नाही; उज्वल निकम यांचा युक्तिवाद.आरोपी ज्ञानेश्वर उर्फ सुदर्शन घुले हा काही काळ वैद्यकीय कारणास्तव व्हिसीद्वारे हजर नव्हता. न्यायालयाने दुसऱ्यांदा पुकारल्यानंतर सुदर्शन घुलेला हजर करण्यात आले.आरोपींचे तीन वकील व्हिसीद्वारे तर तीन वकील प्रत्यक्ष हजर होते.विशेष सरकारी वकील उज्वल निकम तउ द्वारे तर सरकारी सहकारी वकील बाळासाहेब कोल्हे प्रत्यक्ष हजर होते.आरोपी विष्णू चाटेचा कुठे उल्लेख नाही त्याच्या विरोधात पुरावे नाहीत, असं आरोपीचे वकील म्हणाले. आरोपी विष्णू चाटे सुरुवातीपासून या गुन्ह्यात सक्रिय सहभागी होता. तो वाल्मीक कराडचा निरोप देऊन खंडणी मागत होता. हॉटेल तिरंगामध्ये झालेल्या बैठकीत त्याने संतोष देशमुख याला कायमचा धडा शिकवा हा वाल्मिक कराडचा निरोप दिला; सरकारी वकीलांचा युक्तिवाद.

## उधारीवर कपडे न

असे जखमी फिर्यादीचे नाव आहे. संकेत याचे पाटील चौकात कपड्याचे दुकान आहे. १६ डिसेंबर रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास आरोपी पृथ्वीराज जोगदंड आणि अमन मोटेराव हे दोघे त्याच्या दुकानात आले. त्यांनी काही कपडे पसंत केले, मात्र पैसे न देता उधारीवर मागितले. संकेतने उधारी देण्यास स्पष्ट नकार दिला असता, आरोपींनी त्याला शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली आणि तेथून निघून गेले.

काही वेळाने पृथ्वीराज आणि अमन हे त्यांचे साथीदार वीर शिंदे आणि दोनगहु (पूर्ण नाव माहित नाही, सर्व रा. परळी वेस, अंबाजोगाई) यांना घेऊन पुन्हा दुकानात आले. यावेळी पृथ्वीराजने सोबत आणलेल्या कोयत्याने संकेतच्या उजव्या भुवयीवर वार करून त्याला गंभीर जखमी केले. तसेच अमन मोटेराव याने दगड फेकून मारल्याने संकेतचा खालच्या बाजूचा एक दात तुटला. इतर साथीदारांनी त्याला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. आरडाओरडा ऐकून शेजारील दुकानदार कृष्णा मुद्गुलकर, रमेश टेहरे व विशाल पाटील यांनी धाव घेत भांडण सोडवले. जखमी संकेतने दिलेल्या फिर्यादीवरून अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात चारही आरोपींवर भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१), ११७(२), ११५(२), ३५२, ३५१(२) आणि इतर कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार अमोल गायकवाड करीत आहेत.